वर्ष- १० | अंक- ०२ | मुंबई, मंगळवार, २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२३ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मुंबईतील ४५ वर्षीय मधुमेही रुग्णाचा पाय वाचविण्यात बोरिवलीतील डॉक्टरांना

3 → वाघांचा वानप्रस्थ!

घरोघरी आढळणारी सदापुली आहे औषधांचे भांडार! ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# जगात एकच हिंदूहृदयसम्राट ते म्हणजे बाळासाहेब ठाकरे

## उद्धव ठाकरेंचा सीएम एकनाथ शिंदे यांना टोला



**हिंदूहृदयसम्राट देशात नव्हे तर जगात देखील एकच**

हिंदूहृदयसम्राट देशात नव्हे तर जगात देखील एकच आहेत. हिंदूहृदयसम्राट म्हणजे बाळासाहेब ठाकरे हे एकच आहेत. मात्र ही उपाधी देखील काहीजण चोरण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकारणातील या गद्दारांना गाडायला वेळ लागणार नाही. खरे शिवसैनिक या गद्दारांना गाडण्यासाठी परत येत आहेत, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राजस्थानमधील भाजप उमेदवाराच्या बॅनरवर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हिंदूहृदयसम्राट असा उल्लेख करण्यात आला होता. यावरून ठाकरे गटाने एकनाथ शिंदेंवर सडकून टीका केली होती. उद्धव ठाकरे यांनी देखील यावर भाष्य केलं आहे. ठाणे आणि पालघर येथील भाजप, राष्ट्रवादी तसेच आम आदमी पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांनी संबोधित केले. ठाण्याच्या भाजपच्या महिला पदाधिकरी ज्योता पाटील आणि बिपिन गेहलोत, आम आदमी पाटीर्चे प्रवक्ते आणि कामगार नेते संजय बापेरकर तर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष (दादरा नगर हवेली) हरिश्चंद्र कुलात यांनी आज शिवसेनेच्या ठाकरे गटात प्रवेश केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राजस्थानमधील हवामहल विधानसभा क्षेत्रातील भाजप उमेदवार बालमुकुन्द आचार्य यांच्या प्रचारासाठी गेले होते. तेथे दौऱ्याच्या बॅनरवर एकनाथ शिंदे यांचा उल्लेख हिंदूहृदयसम्राट असा करण्यात आला होता.

**पालघरमध्ये लवकरच सभा घेणार**

उद्धव ठाकरे यांनी पुढे म्हटलं की, पालघरकडे माझं दुर्लक्ष झालं. एक निवडणूक आपण जिंकलो आता पुन्हा जिंकू. पालघरमध्ये मी भेटी-गाठीसाठी दौरा करणार आहे. जनतेला काय पाहिजे हे सरकारला कळत नसेल तर जनतेचा आवाज शिवसेना बनेल. मी कोणा व्यक्तीविरोधात नाही वृत्तीविरोधात आहे. लवकरच पालघरमध्ये सभा घेईन, असं देखील उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

## ६ तासांच्या ईडी चौकशीनंतर माजी महापौर किशोरी पेडणेकर, म्हणाल्या..



**■मुंबई। प्रतिनिधी,**

ठाकरे गटाच्या नेत्या आणि मुंबई महापालिकेच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर गुरुवारी ईडी चौकशीला सामोरे गेल्या. त्यांची जवळपास सहा तास चौकशी झाली. किशोरी पेडणेकर यांना याआधीदेखील चौकशीसाठी समन्स बजावण्यात आलं होतं. पण त्या चौकशीला सामोरं गेल्या नव्हत्या. त्यानंतर त्या गुरुवारी चौकशीला सामोरं गेल्या. कोरोना काळात डेडबॉडी बॅगच्या खरेदीत घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आलाय. याच प्रकरणी किशोरी पेडणेकर यांची चौकशी झाली. जवळपास सहा तासांच्या चौकशीनंतर किशोरी पेडणेकर ईडी कार्यालयाबाहेर आल्या. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. ''त्यांनी व्यवस्थित प्रश्न विचारले. मी त्यांना व्यवस्थित उत्तरे दिली आहेत. काही कागदपत्रे मागितले. आम्ही त्यांचीदेखील लवकरच पूर्तता करु. मला असं वाटतं की, केंद्रातून आलेल्या संस्थाना नागरीक म्हणून त्यांना काही प्रश्न होते, तर त्यांच्या प्रश्नांना खरे उत्तरं देणं माझं काम आहे आणि ते मी केलं आहे'', अशी प्रतिक्रिया किशोरी पेडणेकर यांनी दिली.

## केंद्राच्या योजना तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी नियोजन करावे – माजी खा. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे



गुरूवारी ठाणे महानगरपालिकेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष, माजी खा. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, ठाणे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, वर्षा दिक्षीत, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे, उपनगरअभियंता विकास ढोले, घनकचरा विभागाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. राणी शिंदे, यांच्यासह ठाणे महापालिकेच्या विविध विभागाचे संबंधित अधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या योजनांची माहिती करुन घेण्यासाठी गुरुवारी ही बैठक आयोजित केली होती. या बैठकीत डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून ही मोहीम देशभरात राबविली जाणार आहे. प्रत्येक गरजू भारतीय लाभार्थ्याचा शोध घेवून सर्व लाभार्थ्यांपर्यंत केंद्र शासनाच्या योजनांची माहिती व प्रत्यक्ष लाभ पोहोचविणे गरजेचे आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

शासकीय योजनांचे लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचावेत यासाठी 'विकसित भारत संकल्प यात्रा' ही देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून आखण्यात आली आहे. १५ नोव्हेंबरपासून सुरू झालेली ही' विकसित भारत संकल्प यात्रा' मोहिम २६ जानेवारी २०२४ पर्यत सुरु राहणार आहे.

या मोहिमेतील सर्व योजना या तळागाळातील लाभार्थ्यांपर्यत पोहचाव्यात यासाठी ठाणे महापालिकेने महापालिका क्षेत्रातील तळागाळातील लोकांसाठी जनजागृती करणे, सोशल मिडीया उदा. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम या माध्यमातून या योजनांची माहिती पोहचविणे व यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहभागी करुन घ्यावे असे केंद्र शासनास अभिप्रेत आहे.

या मोहिमेद्वारे प्रत्येक नागरिकाचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी सर्व स्तरांवरुन प्रयत्न केले जाणार आहेत.

## कुस्ती प्रशिक्षकाला अटकेपासून अंतरिम संरक्षण

## १० अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचाराचा आरोप

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दहा अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या कुस्ती प्रशिक्षकाला उच्च न्यायालयाने अटकेपासून अंतरिम दिलासा दिला. याचिकाकत्यार्ला कठोर अटींवर अटकेपासून अंतरिम दिलासा दिला जाऊ शकतो, असेही न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या एकलपीठाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले.



सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळल्यानंतर पुणेस्थित ज्ञान प्रबोधिनी प्रशालातील कुस्ती प्रशिक्षक समीर लवार्ते यांनी अंतरिम दिलासा मिळवण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. लवार्ते यांच्यावर जून २०२० ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत १० अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच, त्यांच्यावर बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल आहे. कुस्ती हा खेळ ठराविक कपड्यांमध्ये खेळला जातो. शिवाय. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देताना विद्यार्थी आणि प्रशिक्षकांमध्ये शारीरिक जवळीकही आवश्यक असते, असा दावा याचिकाकर्त्याच्या वतीने अटकेपासून संरक्षण देण्याची मागणी करताना केला. याशिवाय, आखाड्यातील विद्यार्थ्यांना कुस्ती शिकवण्यासाठी शाळेची रीतसर परवानगी घेतल्याचेही याचिकाकर्च्याच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. या सगळ्या बाबींचा विचार करता याचिकाकत्यार्ची कृती गुन्हा ठरत नाही. त्यामुळे, त्याला अटकेपासून अंतरिम संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी लवार्ते यांच्या वतीने न्यायालयाकडे करण्यात आली.

## ३ बांगलादेशी नागरिकांना पनवेलमधून ताब्यात घेतले

**■पनवेल। प्रतिनिधी,**

पनवेल बस आगाराच्या परिसरात तीन बांगलादेशी नागरिकांना पनवेल शहर पोलिसांनी चार दिवसांपूर्वी ताब्यात घेतले आहे. या तिघांची नावे अली हाफीज शेख, रबीवुल मनन शेख, मेसन किसलू मुल्ला अशी आहेत. हे तिघेही काही महिन्यांपासून नवी मुंबईतील दरावे गावात राहत होते. या तिघांनीही बांगलादेश आणि भारत सिमेवरुन घुसखोरी करुन ते विना पारपत्र नवी मुंबईत राहत होते. बांगलादेशातील नोडाईल जिल्ह्यातील जामवीर पडोली या गावातील हे तिघेही मूळ राहणारे आहेत. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतले असून त्यांना लवकरच कायदेशीर कार्यवाहीनंतर त्यांच्या मूळगावी पाठविणार आहेत. या प्रकरणात अजून काही बांगलादेशी नागरिक नवी मुंबईत राहतात का याची चौकशी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितिन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांचे पथक करत आहे.



## विकएन्ड राईडर्स आणि द बाईक फॅक्टरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६.११.२००८ रोजी शाहिद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांचा श्रध्दांजली कार्यक्रम संपन्न (दि. २६.११.२०२३)




**■मुंबई। प्रतिनिधी,**

विक एन्ड राईडर्स चे सर्वेसर्वा अध्यक्ष श्री. शैलेश डिसुजा आणि सचिव श्री. विपुल मेवाडा यांच्या अथक प्रयत्नाने व द बाईक फॅक्टरी यांच्या सहकार्याने मिरारोड येथून सर्व बाईक राईडर्स आपापल्या बाईकवर स्वार होऊन हॉटेल ताज मुंबई, शहिद तुकाराम ओंबळे चौक, तसेच कुलाबा येथे जाऊन बाईक रॅलीचे आयोजन केले. दिनांक २६.११.२००८ रोजी मुंबईवर अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी बंदुकीच्या गोळ्या लागून शहीद झाले होते परंतु तो थरारक प्रकार अनुभवत असताना काही पोलीस अधिकारी सुखरुप बचावले होते. त्यातील पोलीस अधिकारी श्री. अरूण जाधव सरांचे विक एन्ड राईडर्स च्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच ठिकठिकाणी चौकामध्ये जाऊन शहिद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.







पोलीस
बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार, २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२३

# मुंबईतील ४५ वर्षीय मधुमेही रुग्णाचा पाय वाचविण्यात बोरिवलीतील डॉक्टरांना यश

## भारतामध्ये दरवर्षी १ लाख मधुमेही रुग्णांचे कापावे लागतात पाय

**■मुंबई। प्रतिनिधी,**

भारतात लाखो लोक मधुमेहासारख्या गंभीर आजाराने ग्रस्त आहेत, यापैकी २० ते २५ टक्के रूग्णांना त्यांच्या आयुष्यात पायात अल्सर होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार मधुमेहामुळे अंधत्व, मूत्रपिंड निकामी होणे, हृदयविकाराचा झटका, पक्षाघात आणि पायाला अल्सर होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. भारतामध्ये दरवर्षी एक लाखाहून अधिक नागरिकांना मधुमेहामुळे (फूट अल्सर) पाय गमवावा लागत आहे. या आजारात पायापर्यंत ऑक्सिजन आणि पोषण कमी पोहचते. त्याचवेळी, पायातील विषारी घटक किंवा टॉक्सिन्स काढून टाकण्याचे काम पेशी हळूहळू करू लागतात. त्यामुळे पायाला अल्सर म्हणजे जखमा होऊ लागतात.मधुमेह रुग्णांनी पाय बधिर होणे, पायावरील केस जाणे, पायाला सूज येणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. मीरा रोड येथे राहणारे मंगेश भोईर ( वय ४५ वर्षे ) गेली ५ वर्षे फूट अल्सरने आजारी होते, अनेक डॉक्टरांनी पाय कापण्यासाठी सांगितले होते परंतु शेवटचा आशेचा किरण म्हणून अपेक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील, डायबेटिक फूट सर्जन डॉ. श्रीकांत भोयार यांच्याकडे उपचारासाठी आल्यावर डॉ. भोयार यांनी केलर आर्थ्रोप्लास्टी करण्याचे ठरविले यामध्ये पायाच्या अंगठ्याच्या सांध्यावर एक लहान चीरा (कट) करतात . ते सांध्यातील हाडांचा एक छोटासा भाग काढून टाकतात त्यामुळे हालचालींची श्रेणी वाढून तेथील पेशी काम करू लागतात. याविषयी अधिक माहिती देताना डायबेटिक फूट सर्जन डॉ. श्रीकांत भोयार म्हणाले, मधुमेह असलेल्या रुग्णांपैकी सुमारे ५० टक्के रुग्णांना डायबेटिक न्यूरोपॅथीचा सामना करावा लागतो. डायबेटिक न्यूरोपॅथीमध्ये, हात आणि पायांच्या नसा बाधित होतात.पायांमध्ये न्यूरोपॅथीचा सामना करावा लागत असेल तर गॅंग्रीन नावाच्या गंभीर संसगार्चा सामना करावा लागू शकतो. जेंव्हा पायातील पेशी मरतात तेव्हा गॅंग्रीन होतो त्यामुळे अनेकांना पाय कापावा लागतो. मंगेश भोईर जेंव्हा आमच्याकडे आले तेंव्हा त्यांच्या पायातील फारच कमी पेशी जिवंत होत्या त्यामुळे आम्ही केलर आर्थ्रोप्लास्टी करण्याचा निर्णय घेतला यामध्ये आम्ही त्यांच्या उजव्या पायाच्या अंगठ्यावर शस्त्रक्रिया करून सांध्यातील १/३ हाड कापून काढले. गॅंगरिन झालेल्या रुग्णांमध्ये ३३ टक्के रुग्णाचा प्रथम अंगठा कापावा लागतो व काही कालावधीनंतर पाय कापावा लागतो. मधुमेहामुळे पायातील सांधे बधिर होतात पायाचा खालील भाग बधिर होतो पायाचा अंगठा व पाय जिथे एकत्र येतो म्हणजेच सांध्यावर वारंवार जखम होतात व हि जखम बरी करण्याची गरज असते या शल्यचिकित्सेमध्ये पाय व अंगठ्याचा सांधा ओपन करून रक्तप्रवाह वाचवून त्यातील १/३ हाड काढून टाकल्यामुळे तेथील प्रेशर ( दबाब ) कमी होतो व जखम बरी होते त्यामुळे पायाचा अंगठा कापावा लागत नाही व तो रुग्ण चांगले आयुष्य जगू शकतो.

अनियंत्रित मधुमेहामुळे पायांना मुख्यत्वे दोन त्रास होतात. पहिला त्रास म्हणजे पायांच्या नसांना हानी होते. त्याला डायबेटिक न्यूरोपॅथी म्हणतात आणि दुसरा त्रास म्हणजे पायाच्या रक्तपुरवठ्यात बाधा येते व पायांचा रक्तपुरवठा कमी होतो. त्याला पेरिफेरल आरटेरिल डिसीज म्हणतात.पाय सून्न किंवा बधीर होणे, तळपायाची जळजळ होणे किंवा पायाला मुंग्या येणे, पायांचा अथवा बोटांचा आकार बदलणे, पायाची जखम अपेक्षेप्रमाणे लवकर बारी न होणे अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ मधुमेही तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे अशी माहिती अपेक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील, डायबेटिक फूट सर्जन डॉ. श्रीकांत भोयार यांनी दिली.

# सॅटीस पुलाऐवजी काही बसगाड्यांची वाहतूक गावदेवीमधून

## ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाचा निर्णय




**■ठाणे। प्रतिनिधी,**

सॅटीस पुलावर प्रवाशांची होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच गावदेवी बस थांब्याचा वापर नागरिकांकडून केला जावा, यासाठी काही बसगाड्यांची वाहतूक गावदेवी भागातून करण्याचा निर्णय ठाणे परिवहन उपक्रमाने घेतला आहे. शास्त्रीनगर, उपवन, गावंडबाग आणि शिवाईनगर या बसगाड्यांच्या फेऱ्या आता गावदेवी बस थांब्यावरून होणार आहे. ठाणे रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेतील सॅटीस पुलावरून दररोज टिएमटी बसगाड्यांची वाहतूक शहराच्या विविध भागांत सुरू असते. सॅटीस पुलावरील सर्वच बस थांब्यांवर सकाळी आणि रात्रीच्या वेळेत प्रवाशांच्या मोठ्या रांगा असतात. या गर्दीमुळे अनेकदा प्रवाशांना वेळेत बसगाड्या उपलब्ध होत नाहीत. बसगाड्यांच्या प्रतिक्षेत प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागते. तर दुसरीकडे गावदेवी येथे महापालिकेचा मोठा बस थांबा आहे. या बस थांब्यावरून पूर्वी बसगाड्यांची वाहतूक होत होती. ही जागा तशीच पडून आहे. अनेकदा येथे अतिक्रमणाचे प्रयत्न झाले होते. प्रशासनाने येथील अतिक्रमण हटवून हा भाग मोकळा केला. या जागेचा वापर वाढावा आणि सॅटीस पुलावरील प्रवाशांची होणारी गर्दी कमी व्हावी, यासाठी टिएमटीने शास्त्रीनगर, शिवाईनगर, उपवन आणि गावंडबाग भागात होणारी बसगाड्यांची वाहतूक गावदेवी मार्गे करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या शनिवारपासून येथील वाहतूक होणार आहे. गावदेवी येथून शास्त्रीनगर, उपवन, गावंडबाग आणि शिवाईनगर येथील बसगाड्यांची वाहतूक सुरू झाली तर सॅटीस पुलावरील प्रवशांचा भार हलका होण्याची शक्यता आहे.

# नव मतदार नोंदणीसाठी ठाणे जिल्हा प्रशासनाने लढवली शक्कल

**■ठाणे। प्रतिनिधी,**

जिल्ह्यात सद्यस्थितीत मतदार याद्यांचे पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून त्यात पदवीधर निवडणुकांची देखील नोंदणी सुरु आहे. यामध्ये युवकांचा अत्यल्प प्रतिसाद लाभला आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाने युवामहोत्सवाच्या ठिकाणी नव मतदारांच्या नोंदणीचा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे एकाच छताखाली युवकांना मतदार नोंदणीच्या सर्व प्रक्रिया पार पडता येणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय नेहरु युवा केंद्र व कृषी आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्ह्यात युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.



या संदभार्तील आढावा बैठक जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक स्तरावर विजयी होणाऱ्या युवक युवतींना राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या माध्यमातून प्राप्त होणार आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे.

त्यामुळे युवा महोत्सवासाठी महाराष्ट्रात तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर, सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान ही संकल्पना दिलेली आहे. या संकल्पनेवर आधारीत जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवात विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी युवा महोत्सवात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, यासाठी संबंधित प्राचार्यांनी प्रयत्न करावेत, असे आदेश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी बैठकीत दिले आहेत. महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी विशेष स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. या युवा महोत्सवाच्या निमित्ताने १७ ते २१ या वयोगटातील जास्तीत जास्त नवमतदारांची नोंदणी करुन घेण्यासाठी विशेष नियोजन करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

वयोगट व सहभाग पात्रता : या युवा महोत्सव स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी १५ ते २९ वर्षे वयोगट राहील. तसेच जिल्ह्यातील कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ तसेच १५ ते २९ वर्ष वयोगटातील युवांना या युवा महोत्सवामध्ये सहभागासाठी पात्रता राहील. ठाणे जिल्ह्यातील युवा महोत्सवाचे आयोजन लवकरच करण्यात येणार आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत मतदार याद्यांचे पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच पदवीधर निवडणुकांची देखील नोंदणी सुरु आहे.

परंतु यामध्ये युवकांचा कमी प्रतिसाद लाभला आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने युवामहोत्सवाच्या ठिकाणी नव मतदारांच्या नोंदणीचा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे एकाच छताखाली युवकांना मतदार नोंदणीच्या सर्व प्रक्रिया पार पडता येणार आहे. तसेच या महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रथम नोंदणी करणे आवश्यक राहील. अधिक माहितीकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे.

# अंबरनाथच्या काही भागात वीजपुरवठा खंडीत

**■कल्याण ।प्रतिनिधी,**

कल्याण-बदलापूर राज्य मार्गाजवळ महात्मा गांधी विद्यालयाचे प्रांगण तसेच संरक्षण भिंतीलगत रस्त्याच्या बाजूला साधारणतः ३५-४० वर्षे जुनी २५ मीटर उंच मनोऱ्यावर डमी अति उच्चदाब वाहिनी आहे. या वाहिनीतून कसल्याही प्रकारचा विद्युत पुरवठा होत नाही. हे मनोरे व वाहिनी ही फार जुनी असल्याने धोकादायक बनली आहे. तसेच मध्य रेल्वेची ठाकुर्ली ते लोणावळा ही अति उच्चदाब वाहिनी या वाहिनीखालून जाते. त्यामुळे शुक्रवारी (ता. २४) ही वाहिनी हटवण्यात येणार आहे. यामुळे काही कालावधीसाठी अंबरनाथ व उल्हासनगरच्या काही भागाचा वीजपुरवठा बाधित होणार आहे. वाहिनी हटवण्याच्या कामाकरिता महावितरण तसेच मध्य रेल्वेच्या अतिसंवेदनशील भागाचा विद्युत पुरवठा कमीत कमी कालावधीकरिता बंद करून काम करण्यात येणार आहे. त्यामुळे वीजपुरवठा दुपारी १२ ते ४ दरम्यान बाधित होणार आहे. महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, डिफेन्स कॉलनी, कमलाकर नगर, वांद्रापाडा,



नेताजी मार्केट, चिंचपाडा, गांवदेवी, अंबरनाथ केमिकल झोन अंबरनाथ (प), साई सेक्शन, शिव मंदिर रोड, कानसई सेक्शन, भिमनगर, शिवाजी चौक, हुतात्मा चौक, फुले नगर, जावसई, फॉरेस्ट नाका, वडळगाव एम. आय. डी. सी. विभाग, सुभाष टेकडी, लालचक्की मराठा सेक्शन, उल्हासनगर स्टेशन परिसर, ओ.टी. सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), चिंचपाडा, वंदना थिएटर, एम.जे.पी. पाणीपुरवठा, अंबरनाथ स्टेशन रोड, भाजी मार्केट, मातोश्री नगर, जुने म्युनिसिपल कौन्सिल आणि १ नं. एच. टी. ग्राहक, स्वामीनगर, आय. टी. आय., उल्हासनगर ४ व इतर २२/२२ केव्ही अंबरनाथ स्विचिंग स्टेशन येथून पुरवठा होणारा विभाग, उल्हासनगर विभाग २ व ३ मधील काही भागांचा यात समावेश असणार आहे.

# सागरी व खाडी प्रदुषणामुळे छोट्या पारंपारिक मच्छिमारांचा व्यवसाय घटला


**उरण-पनवेल परिसरातील करंजा, मोरा, हनुमान कोळीवाडा, पाणजे, कुंडे गाव खोपटा, वशेणी, न्हावा, गव्हाण, कोपर, उलवा आदी परिसर पारंपारिक मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. या किनाऱ्यावर कोळी समाजाची मोठी वस्ती आहे. पारंपारिक पद्धतीने सुरु असलेला मासेमारीचा व्यवसायच येथील मच्छीमारांचे रोजी रोटीचे साधन आहे. पारंपारिक पद्धतीमध्ये बदल करून या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून व्यवसायात वाढ केली आहे.**



**■उरण। प्रतिनिधी,**

उरण- पनवेलच्या विविध खाड्या, किनारपट्टीवरील जलप्रदूषण वाढले आहे. तर दुसरीकडे मातीचा भराव करून खाडीमुख बुजविण्यात येत आहेत. खाडीतील वाढते जलप्रदूषण आणि भराव यामुळे किनाऱ्याच्या परिसरात आढळणाऱ्या विविध माश्यांच्या काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांना याचा आर्थिक फटका बसला आहे. या मत्स्य दुष्काळाने उपासमारीची वेळ आली आहे. परंतु गेल्या काही वर्षात या व्यवसायात अनेक अडचणी उदभवू लागल्या आहेत. वाढत्या जल प्रदूषणामुळे या व्यवसायावर फार मोठे संकट आले आहे. त्यामुळे किनाऱ्यालगत आणि खाडीत मासळीचे प्रमाण घटले आहे. ''सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन'' या संस्थेने मुंबई परिसरातील व किनारपट्टीच्या परिसरात मत्स्यव्यवसायावर संशोधन केले. या संस्थेच्या अहवालानुसार मुंबई, रायगडच्या सागरी व खाडी परिसरात १२५ माश्यांच्या जाती आढळून येत होत्या. त्यापैकी आता फक्त ७८ जाती शिल्लक आहेत. खाडी, किनारपट्टीवर मिळणारे बोंबील, ढोमी, मांदेली, घोळ, कलेट, कोलंबी, शिंगाली, चिंबोरी, खुबे, कालवे, निवट्या, कोळीम, बोईट, पाखट, बाकस, हेकरु, तांब, मुशी, रावस, जिताडी, शेवंड, पाला, करपाल, टायनी-कापसी कोळंबी, इत्यादी माश्यांचे प्रकार आढळतात. हेच मासे कोळी बांधवाना दैनंदिन रोजी-रोटी मिळवून देतात. पनवेल कोळीवाडा, गव्हाण, कोपर हे क्षेत्र नवी मुंबई विमानतळ बाधित झाले आहे. तर उरण तालुक्यांतील हनुमान कोळीवाडा, पाणजे, मोरा, घारापुरी, न्हावा, गव्हाण हा भाग जेएनपीटी बंदर, शिवडी-न्हावा सि-लिंक या प्रकल्पामुळे बाधीत झाला आहे. करंजा, केगाव, खोपटा, आवरा, वशेणी आदी समुद्र किनारा, खाडी परिसर ओएनजीसी आणि जेएसडब्ल्यु आणि परिसरात उभारण्यात आलेल्या कंटेनर यार्ड आणि बंदरांमुळे बाधीत झाला आहे.तिसरी मुंबई घोषित केल्याने या भागात येणारे नवे प्रकल्प,कोस्टल रोड,बंदरे,जेट्टी आदी प्रकल्प उभारण्याच्या नावाखाली खारफुटीची बेसुमार कत्तल केली जात आहे. दुषित रासायनिक मिश्रित सांडपाणी समुद्र, खाड्यामध्ये सोडण्यात येत आहे.कोणतीही प्रक्रिया न करता सोडण्यात येणाऱ्या रासायनिक मिश्रित दुषित सांडपाण्यामू जल प्रदूषण मोठ्या वाढले आहे.या वाढत्या प्रदूषणामुळे या क्षेत्रांतील भागातून विविध माश्यांच्या जाती नष्ट होत चालल्या आहेत. यामुळे माशांचे प्रमाण कमी झाले आहे. मासेच मिळेनासे झाल्याने येथील पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छीमारांवर उपासमारीचे संकट आले असल्याची माहिती कोकण किनारा मच्छिमार संघटनेचे जयवंत तांडेल यांनी दिली. अशी अनेक संकट, समस्या पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमार भेडसावत आहेत. बंदराच्या वाढत्या विकास आणि सागरी प्रदूषणामुळे पारंपारिक स्थानिक मच्छीमार मत्स्य दुष्काळात सापडलेले आहेत. विकासाच्या नावाखाली होणाऱ्या जल प्रदूषणाचीच अधिक भीती स्थानिक पारंपरिक मच्छीमारांना वाटू लाागली आहे. वाढत्या जलप्रदूषणामुळे मासेमारी क्षेत्र तसेच मासळीच्या प्रजननाची ठिकाणे नष्ट झाले आहेत. तसेच चिखलाचे थर वाढले आहेत.आदि कारणे आणि जलप्रदूषणामुळे पारंपारिक मासेमारी धोक्यात आली असल्याची माहिती मच्छिमारानी दिली आहे.

# एका दिवसांत १.०७ लाखांचा गुटखा, पान मसाला जप्त



**■मुंबई। प्रतिनिधी,**

अन्न व औषध प्रशासनाने मंगळवारी बोरिवली, परळ, दादर, जोगेश्वरी पश्चिम, मुलुंड पश्चिम येथे कारवाई करून १ लाख ७ हजार ४२० रुपयांचा गुटखा व पान मसाला जप्त केला. तसेच याप्रकरणी ११ जणांना अटक करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन आणि मुंबई पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा व पान मसालाची बेकायदा विक्री होत असल्याच्या अनेक तक्रारी अन्न व औषध प्रशासनाकडे आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने मंगळवारी मुंबई पोलिसांच्या मदतीने शहरामध्ये धडक मोहीम हाती घेतली.

जोगेश्वरी पश्चिम येथील ओशिवरा परिसरातील ओशिवरा सुपारी स्टोरवर केलेल्या कारवाईमध्ये तब्बल ८१ हजार ७८ रुपयांचा पान मसाला व सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आला. तसेच तपासणीसाठी तीन नमुने घेण्यात आले. प्रतिबंधित पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी दुकानाचा मालक मोहम्मद अली इर्शाद अहमद शेख याला अटक करण्यात आली. तसेच बोरिवली पश्चिमेकडील चामुंडा सर्कलजवळील गिरिजा स्टोर आणि रोकडिया लेन येथील गोकुळ पान शॉपवरही कारवाई केली. या कारवाईत ९ हजार १९६ रुपये किमतीचा गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आला. यातील १२ नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. या दोन्ही दुकानाच्या मालकांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

त्याचप्रमाणे परळ एस. टी आगराजवळील दुबे पान शॉप आणि दादर पश्चिम येथील बी. एस. रोडवरील किरण पान बिडी शॉपवर कारवाई करण्यात आली. या दुकानांतून ९ हजार १४२ रुपये किमतीचा गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखू जप्त करून २० नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आला. या दोन्ही दुकानांच्या मालकांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

मुलुंड पश्चिम येथील महाकाली पान शॉप, साई पान शॉप, शीव पान शॉप, साची पान शॉप, रानु उपाध्याय पान बिडी शॉप आणि राजेश जेठालाल हॅण्डक्राट या दुकानांवरही कारवाई करण्यात आली. या दुकानांमधून २८ नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तसेच ८ हजार ४ रुपयांचा गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आला. तसेच सहाही दुकान मालकांविरोधत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाने मुंबई पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली.

# गरीबाचापाडा, देवीचापाडा, नवापाडा भागात कचऱ्याचे ढीग, मलनिस्सारणाच्या दुर्गंधीने नागरिक हैराण

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

येथील पश्चिमेतील ह प्रभाग हद्दीतील गरीबाचापाडा, देवीचापाडा, नवापाडा, कुंभारखाणपाडा भागातील परिघ क्षेत्र चाळी असलेल्या भागात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात आहे. हा कचरा रात्रीच्या वेळेत स्थानिकांकडून जाळला जातो. त्यामुळे हवा प्रदूषण होत आहे. हा कचरा पालिकेकडून उचलला जात नसल्याने शहराच्या अंतर्गत भागात स्वच्छता दिसत असली तरी शहराच्या परिघ क्षेत्रावर कचऱ्याचे ढीग, तुटलेली गटारे, रस्त्यावर वाहणारे मलनिस्सारणाचे पाणी असे दृश्य आहे.





देवीचापाडा गोपीनाथ चौक ते जगदंबा माता मंदिर भागात सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या आमदार निधीतून ३०० मीटरचा डांबरी रस्ता तयार करण्यात आला आहे. या रस्त्याच्या दुतर्फा शहरातील नागरिक राडारोडा, कचरा, टाकाऊ वस्तू आणून टाकत आहेत. ठराविक टेम्पो चालक हा राडारोडा टाकण्याचे काम करत आहेत. यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी स्वच्छता अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत.

देवीचापाडा, गरीबाचापाडा, नवापाडा, गणेशनगर भागात उघड्यावर सार्वजनिक ठिकाणी पडलेला कचरा पाहूनही सकाळच्या वेळेत सफाई कामगार, आरोग्य निरीक्षक त्याकडे दुर्लक्ष करत असल्याच्या तक्रारी आहेत. शहराच्या मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर दिसणारा कचरा फक्त उचलला जातो, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या.

पालिकेत तक्रारी केल्या तरी त्याची दखल घेतली जात नाही. सफाई कामगार हजेरी निवाऱ्यावर हजेरी लावून झाल्यानंतर गायब होत आहेत. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. अशीच परिस्थिती कोपर, आयरे भागात आहे. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभाग, ग प्रभागातील परिघ क्षेत्र भागाचा अचानक पाहणी दौरा करून योग्य सूचना अधिकाऱ्यांना देण्याची मागणी नागरिक करत आहेत.

### अर्थसंकल्प आखणीत नागरिकांचा सहभाग

# ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांचा निर्णय

**■ठाणे ।प्रतिनिधी,**

पुढील वर्षाच्या अर्थसंकल्प आखणीत नागरिकांना सहभागी करून घेण्याचा निर्णय महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला आहे. 'माझ्या नजरेतून बदलते ठाणे' या उपक्रमाच्या माध्यमातून आयुक्त अभिजीत बांगर हे थेट नागरिकांशी संवाद साधून त्यांची शहराबद्दलची मते जाणून घेणार आहेत. नागरिकांच्या मताचा अंर्तभाव अर्थसंकल्पात करण्यात येणार आहे.

ठाणे महापालिकेचा आगामी आर्थिक वषार्चा अर्थसंकल्प तयार करण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू झाली आहे. यासाठी आधीच्या अर्थसंकल्पाचा आढावा घेण्यात येत आहे. तसेच, शहराच्या नियोजनाच्या दृष्टीने भविष्यातील योजना, आवश्यकता यांची आखणी केली जात आहे. एखादी समस्या असेल तर तिचा पाठपुरावा करून ती समस्या सोडवण्यासाठी प्रशासनास लोकप्रतिनिधींचे सहकार्य मिळते. माध्यमांचे प्रतिनिधीही वेळोवेळी बातम्यांमधून किंवा प्रत्यक्ष भेटून विविध मुद्दे निदर्शनास आणून देतात. यासोबतच नागरिकांची मते जाणून घेण्याची गरज असल्याने 'माझ्या नजरेतून बदलते ठाणे'; हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय आयुक्त अभिजीत



बांगर यांनी घेतला आहे.

नोव्हेंबर ते जानेवारी या तीन महिन्यांमध्ये विविध गटांच्या माध्यमातून आयुक्त नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. त्यात, डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, शिक्षक, स्वयंसेवी संस्था, उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, महिला व बाल कल्याण या विभागांसाठी कार्यक्रमाची आखणी करताना त्यात अनुभव गाठीशी असलेल्या व्यावसायिकांचा, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग मोलाचा ठरू शकतो. तसेच, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तृतीयपंथीय यांचे प्रश्न लक्षात घेवून त्यांचे प्राधान्यक्रम ठरविणे शक्य होते. त्यामुळे अशा प्रकारच्या चर्चा नेहमीच उपयोगी ठरतात असेही बांगर यांनी स्पष्ट केले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करणाऱ्यांची लोकसंख्या अधिक आहे. या लोकवस्तीत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांसोबत संवाद साधला जाणार आहे. शहरात नागरिकांशी संवाद साधताना काही सूचना, उपाय, बदल सुचविता येतील. शहराच्या जडणघडणीत त्यांना महापालिकेच्या माध्यमातून सहभागी होता येईल. शहराच्या जडणघडणीत योगदान असावे असे प्रत्येकाला वाटते. आता हे शहर मुख्यमंत्र्यांचे शहर असल्याने नागरिक म्हणून आपली जबाबदारीही वाढली आहे.

आरोग्य, स्वच्छता, पाणी पुरवठा, शिक्षण, रस्ते, परिवहन सेवा, याबद्दल नागरिक वेळोवेळी मते मांडतात. तसेच, सुधारणा दिसू लागली की कौतुकही करतात. कचरा टाकण्याची पारंपरिक ठिकाणे आता स्वच्छ राहू लागली आहेत. दिवसातून दोन वेळा रस्त्यांची सफाई होऊ लागली आहे. याबद्दल नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद येतो आहे. या पार्श्वभूमीवर, 'माझ्या नजरेतून बदलते ठाणे' या उपक्रमातून ठोस मुद्दे समोर येऊ शकतील.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार, २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२३


# संपादकीय... स्वच्छ महाराष्ट्र, स्वस्थ महाराष्ट्र...!



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

हल्ली जिकडे तिकडे फार घाण झाली आहे. सर्वत्र अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. माणसाने आपले जीवन कसे आरशासारखे लख्ख ठेवले पाहिजे. पण महाराष्ट्रातील गावेच्या गावे अस्वच्छ होत चालली आहेत. तिथे जीवनाचे काय होय? अस्वच्छतेमुळे जीवनमान खालावते. मग प्रदूषण वाढते. पाठोपाठ रोगराई वाढते. रोगराई वाढली की अस्वच्छता वाढते... असे हे दुष्टचक्र आहे. मुंबईची अवस्था तर उकिरड्यासारखी झाली आहे. बघावे तिकडे कचऱ्याचे ढिगारे आणि दुर्गंधी. मुंबईकर हे कचरानिर्मितीत राष्ट्रीय पातळीवर अग्रेसर आहेत, असे म्हणतात. असेच चालू राहिले, तर भारताची आर्थिक राजधानी अशी ओळख असलेली मुंबापुरी एक दिवस काचरिक राजधानी म्हणून ओळखली जाईल, अशी भीती मुंबईकरांनाच वाटते. सुदैवाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय कर्मवीर (मु. पो. ठाणे.) भाईसाहेब यांच्यासारखे गतिमान नेतृत्व आपल्याला लाभले आहे. त्यामुळे मुंबईचा बदलौकिक होणार नाही, याची आम्हाला खात्री वाटते. परवा मुंबईतील अस्वच्छतेमुळे ते फार गंभीर झाले, आणि त्यांनी थेट मुंबईचा दौरा काढला. ठिकठिकाणी जाऊन भेटी देत स्वच्छतेविषयी काही मौलिक सूचना करत काही गतिमान निर्णयही घेतले.

मुंबईच्या संदर्भात आधी रस्ते धुऊन काढा असे आदेश त्यांनी तिथल्या तिथे तातडीने काढले. रस्ते धुऊन लख्ख केले की मुंबईकरांना त्यावर चपला-सँडले घालून चालणे जीवावर येईल आणि स्वच्छता टिकून राहील, अशी ही कल्पक योजना आहे. ज्या रस्त्यांवरुन रोज दीड कोटी माणसे (चपलाबूट घालून) ये-जा करतात, तेथे निदान झाडूपोछा तरी करायला हवा की नको?

आपल्या दौऱ्यात मुंबई (जमेल तितकी) स्वच्छ ठेवणारे सफाई कामगार, सफाई कंत्राटदार, घंटागाडीवाले यांच्यासोबत ते स्वच्छ कपातून चहा प्यायले. चहा उकळलेला होता! सफाई कामगारांच्या स्वच्छताकार्याचे कौतुक करतानाच त्यांनी चहा असो, वा पाणी, माणसाने हमेशा उकळून प्यावे, असा सल्ला दिला. पाणी उकळले की त्यातील रोगजंतू मरतात. उकळलेले पाणी पिण्यापेक्षा उकळलेला चहा प्यावा. चहा आणि चहावाला दोघेही तसे लाभदायक असतात. त्याने प्रतिकारशक्ती वाढते. चहाचा कपदेखील स्वच्छ धुतलेला असावा, असे ते म्हणाले.

मुंबईतील रस्ते धुण्यासाठी समुद्राचे पाणी उपसून वापरता येईल का, याची चाचपणी सध्या सुरु आहे. समुद्रातील पाण्याने रस्ते, इमारती, वस्त्या स्वच्छ धुवायचे, आणि ते पाणी पुन्हा समुद्रात सोडून द्यायचे, अशी ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. तथापि, समुद्राच्या खारट पाण्याने रस्ते धुतल्यास मुंबईच्या अंगाला खाज येईल, अशी भीती आहे. म्हणून कर्मवीर भाईसाहेबांनी नवी शक्कल काढली आहे.

कृत्रिम पाऊस पाडून रस्ते धुवायचे!! दिवाळीच्या दिवसात आपण पिंपातील पाणी ओतून ओतून घरातील फरश्या धुतो की नाही? तसेच!! कृत्रिम पावसासाठी क्लाऊड सीडिंग करावे लागते. ते केल्यावर मुंबईच्या आकाशात कमी दाबाचा हवेचा पट्टा निर्माण केला की झाले!! बदाबदा पाणी!! आहे काय नि नाही काय!!

येत्या काही काळात मुंबई चकाचक करण्याचा संकल्प कर्मवीर भाईसाहेबांनी सोडला आहे. मुंबईच्या धर्तीवर पुणे आणि नागपूरही धुऊन काढा, असा आग्रह धरण्यात येत आहे. पुण्यात कृत्रिम पाऊस पाडणे अवघड नाही. (खरे तर पुण्यात काहीच अवघड नाही!) पण कृत्रिम पाऊस पाडल्यावर भिडे पूल पुन्हा पाण्याखाली गेला तर काय करायचे, हा प्रश्न आहे, म्हणून पुण्याची स्वच्छता किंचित लांबणीवर पडली आहे. नागपूरला स्वच्छता अभियान केव्हाच जाहीर झाले आहे, परंतु, उद्यापासून सुरु करु बे असे रोज म्हणता म्हणता येवढे दिवस गेले. असो.

# वाघांचा वानप्रस्थ!



ऐन उमेदीच्या काळात वलयांकित आयुष्य जगणाऱ्याला आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकीपणाला सामोरे जावे लागणे ही मानवी जीवनात तशी सामान्य बाब. एखाद्याचे असे एकाकीपणात जगणे समोर आले की समाजमन हळहळते. अनेकदा याचा उलगडा त्याच्या मृत्यूनंतरच होतो. तेव्हा या हळहळीची तीव्रता अनेकदा अनुभवास येते. काही वर्षांपूर्वी परवीन बाबीचा झालेला मृत्यू किंवा अगदी अलीकडे रवींद्र महाजनींना आलेले मरण ही त्यातली प्रातिनिधिक ठरावी अशी उदाहरणे. हे मानवाच्या बाबतीत होते तसेच प्राण्यांच्या बाबतीतही घडते का? घडले तर आपण त्याकडे कसे बघतो? असे व्हायला नको होते यापलीकडे आपल्या प्रतिक्रिया कधी जातात का? मानव असो वा प्राणी, कुठल्याही सजीवाच्या बाबतीत हे घडायला नको यासाठी आपल्याकडून कृतीपर हालचाली होतात का? काया, वाचा, मन असलेल्या मानवाच्या व्यक्तिगत आयुष्यात कशाला डोकवायचे असे म्हणत त्याच्या एकाकी जगण्याकडे दुर्लक्ष करणे एखादवेळी समजून घेता येईल, पण फक्त काया व मन असलेल्या प्राण्यांच्या बाबतीत ही भूमिका योग्य कशी ठरू शकते? हे सारे प्रश्न उपस्थित झालेत ते ताडोबातील म्हमायाम्हच्या बेपत्ता होण्याने. पर्यटकांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली ही वाघीण गेले तीन महिने दिसेनाशी झाली आहे. वन कर्मचाऱ्यांनी शोधमोहीम सुरू केल्यावर तिच्या अधिवासात हाडांचा सांगाडा मिळाला. तो तिचाच असल्याची चर्चा सुरू झाली. डीएनए चाचणीनंतर याचा उलगडा होईलच, पण यानिमित्ताने वाघांच्या वृद्धत्वाचा मुद्दा प्रकर्षाने समोर आला.

२०१० पासून पांढरपवनी अधिवासात राहून लाखो पर्यटकांच्या दिलाचा ठाव घेणाऱ्या वलयांकित मायाचे हरवणे आयुष्याच्या उतारवयातील एकाकी जगण्याची जाणीव करून देणारे, चटका लावणारे आणि त्यासोबतच अनेक प्रश्न उपस्थित करणारे. वार्धक्यात असे विजनवासी जिणे कुणाच्याही वाटयाला येऊ नये ही भावना तशी सार्वत्रिक. म्हणूनच वृद्धांची काळजी, त्यांचे संगोपन यासाठी झटणाऱ्यांची संख्याही अलीकडच्या काळात वाढत चालली आहे. केवळ माणूसच नाही तर पाळीव प्राण्यांच्या बाबतीतही समाजात सजगता आली आहे. अशांचे मरण तरी किमान सुखकर व्हावे हाच यामागचा हेतू. त्याच न्यायाने वाघ व अन्य प्राण्यांकडेही बघायला हवे असा संदेश मायाच्या विषयाने साऱ्यांना दिला आहे. अवघे तेरा ते सोळा वर्षांचे आयुर्मान असलेल्या वाघांना उतारवयात अनेक संकटांचा सामना करावा लागतो. शिकारीची क्षमता गमावून बसलेला, सारी गात्रे शिथिल झालेला हा रुबाबदार प्राणी पोटाची भूक शमवण्यासाठी वणवण भटकत असतो. कुठे तरी आश्रय मिळेल या आशेवर जगत असतो. अशा स्थितीत त्याला काय हवे ते बघणे, त्याला शिकार मिळेल की नाही हे बघणे, त्याच्यावर सतत देखरेख ठेवणे हे काम व्याघ्र प्रकल्पांच्या व्यवस्थापनांचे. त्यात थोडी जरी कुचराई झाली की या मुक्या प्राण्याच्या एकाकी जगण्यातील संकटाच्या छटा आणखी गडद होत जातात.

मायाच्या अधिवासात सांगाडा सापडण्याच्या दोन दिवस आधी याच ताडोबा परिसरात खडसंगीजवळ बजरंग या वृद्ध वाघाचा मृतदेह आढळला. चौकशीतून कळले की तो त्याच परिसरात छोटा मटका या नावाने परिचित असलेल्या वाघाने केलेली शिकार खायला गेला होता. त्यातून दोघांत झुंज झाली व बजरंगला जीव गमवावा लागला. वन खात्याने या मृत्यूची नोंद अधिवासासाठी लढाई अशी केली आणि बजरंगच्या मृत्यूवर पडदा टाकला. वृद्ध वाघांच्या बाबतीत हे घडतेच. पण शेवटी हा निसर्गचक्राचा नियम, त्याला कोण काय करणार असा पवित्रा घेत किती काळ स्वस्थ बसायचे? वाघ हा जंगल पर्यटनाच्या साखळीतला अतिशय महत्त्वाचा घटक. या पर्यटनाचा अख्खा डोलाराच त्याच्या दिसण्यावर उभा असेल तर वृद्धापकाळात त्याची विशेष काळजी घेणे सरकारचे कर्तव्य ठरत नाही काय?

जसे वय झालेल्या माणसांना आपण जास्त हालचाल करू देत नाही, त्यांना दगदग व्हायला नको याची काळजी घेतो, तशी या प्राण्यांच्या बाबतीत घ्यायला काय अडचण आहे? अशा वृद्ध वाघांच्या संदर्भात राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाच्या विशेष सूचना नाहीत. मात्र अशा वाघांच्या अधिवासातले पर्यटन नियंत्रित करावे, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्याचे पालन खरोखर होते का? असे वय झालेले वाघ एकाकी पडतात. अगदी वृद्ध व्यक्तींसारखेच. त्यामुळे त्यांना आणखी त्रास व्हायला नको याची काळजी घेतली जाते का? एकांतवास व एकाकीपणा यात फरक आहे. तो जाणून घेतच या प्राण्यांच्या व्यवस्थापनाकडे लक्ष द्यायला हवे ही भावना अजूनही सरकारी पातळीवर रुजली नाही हेच या घटना दाखवून देतात. वाघ वाढले यात आनंद मानण्याचे दिवस आता सरले. आता गरज आहे ती त्यांचे आयुष्य सुखकर कसे होईल हे बघण्याची. त्या दृष्टीने विचार करण्याची वेळ माया व बजरंगमुळे आली आहे. उण्यापुऱ्या साडेतेरा वर्षांच्या आयुष्यात पाच वेळा प्रसवलेल्या मायाने तीन वेळा मानवांवर हल्ले केले. त्यात ठार झालेले तिघेही वन कर्मचारी होते. शासकीय कर्तव्य बजावण्याच्या प्रयत्नात हे तिघे तिच्याजवळ गेले व जीव गमावून बसले. यावरून या प्राण्याला एकांतवास किती प्रिय हेच दिसून येते. तिच्या या कृतीची चिकित्सा करत किमान शेवटच्या काळात तरी तिच्या अधिवासाभोवतालचे पर्यटन कमी करता आले असते. असे नियंत्रण देखरेख कर्मचाऱ्यांसाठी अनुकूल स्थिती निर्माण करत असते.

मानवाचा वावर कमी झालेला दिसला की वाघही मुक्तपणे संचार करायला लागतो. त्याला न्याहाळण्याची प्रक्रिया अधिक बारकाव्याने राबवता येते व त्यानुसार सोयी उपलब्ध करून देता येतात. प्राण्यांच्या देखरेखीतले हे साधे तत्त्व. मात्र अलीकडे पर्यटन व त्यातून होणाऱ्या आर्थिक उलाढालीच्या नादात साऱ्यांनाच त्याचा विसर पडला आहे. अर्थकारणाच्या या लालसेतून वाटाडया, हॉटेल्स व रिसॉर्टचे मालक आणि कर्मचारी अशी युतीच जन्माला आली आहे. त्यात भर पडते ती उत्साही पर्यटकांची. कुठेच वाघ दिसला नाही तर जा पांढरपवनीला माया नक्की दर्शन देईल असे निरोप जन्म घेतात ते या युतीतून. मायाचे वय झाले, आता तिला त्रास देण्यात अर्थ नाही असा परोपकारी विचार मागे पडतो तो यातून. घरातल्या वृद्धांच्या बाबतीत आपण असे वागतो का असा साधा प्रश्नही यातल्या कुणाला पडत नाही. वाघच दिसला नाही तर पर्यटक गर्दी कसे करणार या चिंतेने व्यवस्थापनाला ग्रासलेले असते. त्यामुळे त्यांच्याकडूनही या कृतीकडे काणाडोळा होतोच. ही वृत्ती जोवर बदलणार नाही तोवर वाघाचे जीवन सुखकर होणार नाही. माणूस असो वा वाघ, यापैकी कुणीही अमरपट्टा घेऊन जन्माला आलेले नाही हे खरेच, पण त्यांना स्वस्थ जीवन जगता यावे यासाठी जसे मानवी जीवांसाठी प्रयत्न होतात तसेच वाघांसाठीही व्हायला हवेत. त्यासाठी व्याघ्र प्राधिकरणानेही त्यांच्या दृष्टिकोनात बदल करण्याची वेळ आता आली आहे. देशात वृद्धत्वाकडे झुकलेले वाघ नेमके किती? तिथे पर्यटकांचा वावर नेमका कसा? त्यांच्या अधिवासाची स्थिती नेमकी काय? यावर विचार करून नव्याने मार्गदर्शक सूचना जारी व्हायला हव्यात. आजमितीस अशी कोणतीही आकडेवारी या प्राधिकरणाकडे उपलब्ध नाही. एखादा वाघ जखमी झाला अथवा मानवावर हल्ले करता झाला की तेवढयापुरती तत्परता दाखवायची एवढयाने काम भागणारे नाही.

देशात वाघ कमी होते तेव्हा तयार केलेल्या मार्गदर्शक सूचना काळानुरूप बदलायला हव्यात. आता वाघाची संख्या वाढली आहे, हे लक्षात घेत त्यांचे जीवनमान कसे उंचावेल या दृष्टीने विचार व्हायला हवा. माणूस प्रगत होत गेला तसतसे त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. वृद्धापकाळ हा प्रत्येकासाठी संवेदनशील विषय ठरू लागला. त्यातून अनेक नवे उपाय जन्मले. त्याच दृष्टिकोनातून आता वाघांकडे बघायला हवे, तरच आपल्या सुसंस्कृतपणात भर पडेल. माया असो, बजरंग असो वा एखादा प्रसिद्धीच्या झोतात असलेला माणूस. यांच्या एकाकीपणातून ओढवलेल्या मृत्यूची चर्चा तरी होते, पण अनाम अवस्थेत जगणाऱ्या शेकडो वाघांचे काय, या प्रश्नावर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आता आली आहे.

# शस्त्रसंधीची तिरीप

इस्त्राईल-हमास यांच्यात सुमारे सहा आठवड्यांपूर्वी सुरू झालेल्या युद्धाच्या भडक्याने गाझा पट्टीचा बराच भाग बेचिराख करून टाकल्यानंतर का होईना तात्पुरत्या शस्त्रसंधीचे शहाणपण दोन्ही बाजूंना सुचले, हेही नसे थोडके. आता याचे रूपांतर कायमस्वरूपी शांततेत व्हावे, यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हायला हवेत. युद्धाचे उद्दिष्ट काय होते आणि प्रत्यक्षातील कारवाईचे स्वरूप काय, हे पाहिले तर त्यातील तफावत चटकन लक्षात येते. हमाससारख्या दहशतवादाचा मार्ग स्वीकारणाऱ्या संघटनेचे कंबरडे मोडलेच पाहिजे, यात दुमत नाही. परंतु युद्धाच्या ज्वाळा सगळेच भस्मसात करीत निघाल्या आहेत. हमासने सात ऑक्टोबर रोजी इस्त्राईलवर केलेल्या हल्ल्याने बाराशे लोकांचा बळी घेतला; प्रत्युत्तरादाखल इस्त्राईलने हमासविरोधात गाझा पट्टीत उघडलेल्या मोहिमेने आतापर्यंत चौदा हजारांवर पॅलेस्टिनींचा बळी घेतला आहे. या भागातील तेवीस लाखांपैकी सतरा लाखांवर नागरिक विस्थापित झाले आहेत. इस्त्राईल आणि पॅलेस्टाईन या दोघांच्याही समर्थकांनी युद्धविरोधी मोहिमा उघडलेल्या आहेत. हमास त्यांच्या ताब्यातील पन्नास इस्त्राईली नागरिकांची सुटका करणार आणि त्या बदल्यात इस्त्राईल त्यांच्या तुरुंगातील दीडशे पॅलेस्टिनी महिला, मुलांची सुटका करणार आहे. चार दिवसांत ही प्रक्रिया पार पडत असतानाच इजिप्तमधून गाझामध्ये शेकडो ट्रकद्वारे गाझावासीयांना औषधे, अन्नधान्य, इंधन यांच्यासह जीवनावश्यक साहित्य पुरवठ्याचा मार्ग खुला केला जाईल. हमासने आणखी अपहृतांच्या सुटकेची तयारी दाखवली, तर दहा व्यक्तींमागे एक दिवस याप्रमाणे शस्त्रसंधीचा अंमल वाढवला जाईल. इस्त्राईल-हमास संघषार्ने टोकाचे रूप घेतले असताना झालेल्या तात्पुरत्या शस्त्रसंधीने विचारविमशार्ला आणि थंड डोक्याने भविष्यातील योजना आखण्याला उभय बाजूंना अवधी मिळेल, हे खरे.

ही शस्त्रसंधी पूर्णविराम देणारी नसली तरी उभयतांमध्ये विश्वासाचे, समजुतीचे वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल म्हणता येईल. तथापि, त्याला व्यापक रूप द्यायचे की पुन्हा येरे माझ्या मागल्या करायचे हेदेखील यातील दोन्हीही बाजूंवर अवलंबून आहे. हमासने इस्त्राईलवर केलेला दहशतवादी हल्ला अत्यंत निंदनीय आहे. त्याचे कधीच कोणीही कदापिही समर्थन करणार नाही. त्याला इस्त्राईलने दिलेले प्रत्युत्तर हा एका मयार्देतच स्वसंरक्षणाचा भाग मानता येईल.

हमासला नेस्तनाबूत करण्याचा त्याचा इरादाही अमान्य करता येणार नाही. तथापि, हमासला धडा शिकवताना निष्पाप पॅलेस्टिनी नागरिकांचा इस्त्राईलने बळी घेणे, गाझा पट्टीतील रुग्णालये भुईसपाट करणे, तेथील नागरिकांचे अन्नपाणी तोडणे आणि युद्धविषयक संकेतांची कोणतीही पत्रास न ठेवता सर्वसामान्य नागरिक, रुग्ण, महिला-मुलांना लक्ष्य करणे, त्यांचा बळी घेणे हे हीन कृत्यच म्हटले पाहिजे.

त्यामुळेच सुरुवातीला हमासच्या हल्ल्यामुळे इस्त्राईलमागे जगभरातून उभे राहिलेले जनमत विरोधात जाऊ लागले. इस्त्राईलसह अमेरिका, युरोपातील अनेक देशांसह संयुक्त राष्ट्रांतही मानवतेच्या भूमिकेतून गाझातील पेच सोडवा, हीच भूमिका व्यक्त होत आहे.



या जनमताच्या रेट्याला अनुकूल अशी घटना हमासने ओलिसांच्या सुटकेच्या घेतलेल्या निर्णयाने घडत आहे. खरेतर हमासने इस्त्रायलींना ओलिस ठेवण्यासाठी केलेल्या अपहरणनाट्यापासूनच सुटकेच्या प्रयत्नांना प्रारंभ झालेला होता. कतारने त्यात पुढाकार घेतला; मग अमेरिका, इस्त्राईल, इजिप्त यांचे राष्ट्रीय सुरक्षेतील व गुप्तचर यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये दीर्घकालीन वाटघाटी झाल्या. त्याला यश येऊन सुटकेचा आणि त्यादरम्यान शस्त्रसंधीचा निर्णय झाला. कतारचे अमीर शेख तमीम बीन हमद-अल थानी, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतेह अल-शिशी, अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन तसेच इस्त्राईलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्या कानापर्यंत सल्लामसलती जात होत्या आणि अखेरीस सुटकेचा मार्ग सुकर झाला. काही दिवसांपूर्वी झालेल्या दोन अमेरिकी महिलांच्या सुटकेने उभयपक्षी विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, आपल्या भूमिकेपासून इस्त्राईल तसूभरही मागे हटायला तयार नाही. हमासचा निःपात हेच त्याचे उद्दिष्ट आहे.

ही शस्त्रसंधी संपल्यानंतर गाझावासीयांना पुन्हा हल्ल्याला तोंड द्यावेच लागेल, अशी दर्पोक्ती नेतान्याहू यांनी केली आहे. खरे तर इस्त्राईलने युद्ध संपवण्याच्या दिशेने पावले टाकावीत, अशी जगभरातून मागणी आहे. ६८ टक्के अमेरिकी शस्त्रसंधीच्या बाजूने आहेत. वंशभेदाच्या आगीने होरपळलेल्या ज्यू नागरिकांनी पॅलेस्टिनींचा चालवलेला नरसंहार म्हणजे इतिहासातून धडा न घेता चालवलेली कारवाई, अशी टीका होत आहे. इस्त्राईलमध्ये सध्या नेतान्याहूंची लोकप्रियताही घटत आहे. इस्त्राईली जनमत युद्ध थांबवण्याच्या दिशेने वळत आहे. याची कारणे अनेक आहेत. इस्त्राईलच्या अर्थकारणाला ग्रहण लागत आहे. इस्त्रायलींना सेवा देणाऱ्या कंपन्या आणि इस्त्राईलकडून सेवा व तांत्रिक सहकार्य घेणाऱ्या कंपन्यांच्या कामकाजाचा खोळंबा होतो आहे. महत्त्वाचे म्हणजे कुशल मनुष्यबळ युद्धाच्या आघाडीवर गेल्याने कंपन्यांचे कामकाज विस्कळीत झाले आहे. अल-शिफा रुग्णालयाखालून हमासने बोगदे केले आहेत, तेथे त्यांची शिबंदी आहे, असे सांगत इस्त्राईलने त्यावर घृणास्पद हल्ला केला. इस्त्राईल आपल्या आरोपाच्या पुष्ट्यर्थ सज्जड पुरावा देऊ शकलेले नाही. सूडाचे हे चक्र थांबवणे व्यापक हिताचे आहे. शस्त्रसंधी तात्पुरती न राहता त्याद्वारे इस्त्राईल आणि हमास यांच्यात एकमेकांबाबत विश्वास कसा वाढवता येईल, याचे प्रयत्न अमेरिका व इतर मध्यस्थांकडून किती परिणामकारकरीत्या होतात, यावर शांतता अवलंबून आहे.

# 'कडवट' सांगावा

महाराष्ट्रात एकीकडे ऊसदराच्या निमित्ताने आणखी एका आंदोलनाची जुळवाजुळव सुरू असतानाच आहारमानात अविभाज्य भाग बनलेल्या साखरेच्या उत्पादनात जागतिक पातळीवर ३५ लाख टनांची घट येण्याचा अंदाज जागतिक अन्न संघटनेने वर्तविणे हा निव्वळ योगायोग असला, तरी या दोन्ही वार्ता येत्या काळात सामान्यजन व उत्पादकांचेही तोंड कडू करणाऱ्या तसेच डोकेदुखी वाढविणाऱ्या आहेत. एल निनोसह वातावरणीय बदलांमुळे आलेली पर्जन्यतूट व तापमान वाढीमुळे ब्राझीलचा अपवाद वगळता भारत, चीन, थायलंड आणि पाकिस्तान या प्रमुख उत्पादक देशांत साखर उत्पादनात घट येणार, असा अंदाज आहे. जागतिक स्तरावरील उत्पादनात ३५ लाख टनांची घट अपेक्षित धरून हे उत्पादन एक हजार ६७३ लाख टनांपर्यंतच होऊ शकते.

दोन वर्षांपूर्वीच ब्राझीलला मागे टाकत जागतिक उत्पादनात तसेच ग्राहक संख्येत अव्वल स्थान पटकावणाऱ्या भारताचे उत्पादनही ३३७ लाख टनांपर्यंत कमी होण्याचा इशारा देण्यात आल्याने शेती व सहकार क्षेत्रावरील चिंतेचे ढग आणखी गडद होण्याची चिन्हे आहेत. उत्तर प्रदेशातील स्थिती तुलनेने बरी असली, तरी दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या, देशाच्या उत्पादनात एक तृतीयांश वाटा उचलणाऱ्या महाराष्ट्रातही साखरेचे उत्पादन पंधरा ते वीस टक्क्यांपर्यंत घटेल, असा अंदाज शुगर मिल असोसिएशनसह कृषितज्ज्ञांनी वर्तविल्याने आगामी काळ कठीणच राहणार, असे दिसते. तीन हंगामांचा विचार करता, राज्याचे साखर उत्पादन अनुक्रमे १३७ लाख टनांवरून १०५ आणि आता ९० लाख टनांपर्यंत घसरण्याची शक्यता पाहता शेतकरी-कारखानदार-ग्राहक अशा सर्वच घटकांच्या तोंडचे पाणी पळणार आहे.

यंदा सहकारी आणि खासगी मिळून सुमारे २१० कारखान्यांत गाळप सुरू होणार असल्याचे दावे केले जात आहेत. प्रत्यक्षात शासनाने येन केन प्रकारे थकहमीचा निर्णय घेऊनही राज्य बँकेने मदतीची विनंती कानामागे टाकल्याने आर्थिक गर्तेत सापडलेल्या प्रमुख कारखान्यांचे बॉयलर पेटण्याची शक्यता धूसर दिसते. यातील अनेक कारखाने भ्रष्टाचारात बरबटून मशिनरीही एव्हाना गंजली असल्याचे नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. थकहमीचा तिढा व कजार्चा विळख्यात गुरफटलेल्या कारखानदारीसमोर ऊसदराच्या आंदोलनामुळे नवे संकट उभे आहे. शेतकऱ्यांनी गेल्या वर्षीच्या हंगामासाठी प्रतिटन ४०० रुपये वाढीव देण्यासह साडेतीन हजारांची पहिली उचल मागितल्याने सर्वात मोठा साखरपट्टा असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात जागोजागी आंदोलनांचा फड जमू लागला आहे. गतानुभव पाहता शेवटी आंदोलनांची धग कमी होऊन जोमाने ऊसतोड सुरूही होईल. परंतु, तोपर्यंत राजकीय घुसळणीमुळे ही आंदोलने अधिक पेटवली जाऊन सरकारच्या



कोंडीचे प्रयत्न झाल्यास आश्चर्य वाटायला नको. राज्यात १५ लाख हेक्टरवर ऊस लागवड होऊनही ऑगस्टमध्ये ५९ टक्क्यांपर्यंत पाऊसतूट झाल्याने साखरेचा उतारा एवीतेवी घटणार आहेच. सर्वाधिक पाणी पिणारे पीक म्हणून ऊस कुप्रसिद्ध असला, तरी कमी कष्टांत रोख पैसे मिळत असल्याने सिंचनसुविधा असलेले शेतकरी त्यालाच पसंती देतात.

या पिकाच्या अतिलागवडीचे दुष्परिणाम मागील दोन दशकांपासून चर्चिले जात आहेत, तरीही उत्पादकांना सक्षम पर्याय उपलब्ध नसल्याने हस्तिदंती मनोऱ्यातून घेतलेले निर्णय उत्पादक आणि ग्राहकांच्याही हिताचे नाहीत. सद्यस्थितीत जागतिक बाजारात ५५ टक्क्यांपर्यंत साखरेचे दर वाढले आहेत. भारतातही मागील तीन-चार महिन्यांत दहा ते बारा टक्क्यांपर्यंत साखरेची किंमतवाढ झाली. येत्या काही दिवसांत उत्पादनाचे नेमके चित्र स्पष्ट होऊ लागल्यास साखर आणखी उसळी घेऊन महागाईचे चटके बसू शकतात. त्यामुळे उत्पादक, ग्राहक, साखर कारखाने या तीनही घटकांचे आणि अर्थव्यवस्थेचेही भले साधायचे असेल, तर आतापासूनच कामाला लागून उपाय योजायला हवेत. तहान लागल्यावर विहीर खोदण्याचे नेहमीचे प्रकार थांबायला हवेत. साखरेचा मुबलक बफर स्टॉक असल्याने काळजीचे कारण नसल्याचा दावा राज्यशकट हाकणारी मंडळी करीत असली, तरी नुकतेच कांदा आणि टोमॅटोबाबत अशाच वल्गना कशा फोल होत्या, याची प्रचिती देशाला आली आहेच. ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये, अशी म्हणसुद्धा पूवार्पार प्रचलित झाली. तरीही, कृषी क्षेत्राबाबत राज्यकर्त्यांचे वागणे नेहमीच उरफाटे राहिले, मग सरकार कुणाचेही असो! नव्या वर्षात काही प्रमुख राज्यांच्या विधानसभा आणि सोबतच सार्वत्रिक निवडणूकही असल्याने जोखीम नको, म्हणून बाजारातील महागाई आटोक्यात ठेवण्यासाठी आयत्यावेळी निर्यातबंदी, निर्यातशुल्क, साखरसाठा मर्यादा बंधन, छापासत्र अशी खास सरकारी आयुधे परजली जाऊ शकतात. तसे झाल्यास कांद्याप्रमाणेच उस उत्पादकांचाही रोष सरकारवर वाढू शकतो. अर्थात, विद्यमान सरकारला एकगठ्ठा मतपेढी राजकारणामुळे तशीही शहरी वगार्ची काळजी तुलनेने अधिक असल्याने शेतीची पर्वा न करता धक्कादायक निर्णय होऊ शकतील, असे दिसते.

# घरोघरी आढळणारी सदाफुली आहे औषधांचे भांडार!

आपल्या देशात सर्रास आढळणाऱ्या वनस्पतींमध्ये सदाफुलीचा समावेश आहे. घरोघरी आढळणाऱ्या सदाफुलीचं मूळ हे दक्षिण आफ्रिकेतल्या मॅडगास्कर राज्यातलं आहे. पण, ही वनस्पती आता भारतामध्ये चांगलीच स्थिरावलीय. आयुवेर्दामध्ये या वनस्पतीचं मोठं महत्त्व आहे. पुण्यातले गुरुजी राजेश जोशी यांनी याबाबत माहिती सांगितली आहे.तंत्र वनस्पती शास्त्रामध्ये सदाफुलीचं मोठं महत्त्व आहे. 'ही वनस्पती मुलधारा चक्रावर काम करते. हे चक्र असंतुलित झाल्यावर पोटाचे किंवा पायाचे विकार अथवा पॅरालेसिस होऊ शकते. या चक्रावर काम करणारी सदाफुली ही एकमेव वनस्पती आहे. त्यामुळे तिला खास महत्त्व असल्याचं जोशी यांनी सांगितलं.सावधान! पाकिटात 'या' गोष्टी ठेवल्यामुळे होऊ शकतो अफाट खर्चतंत्र वनस्पती शास्त्रानुसार सदाफुली ही वनस्पती विशेष करून मूलधारा चक्रावर काम करते मूलधारा चक्र ज्यावेळेस इन बॅलन्स होते त्यावेळेस पोटाचे विकार पायांचे विकार किंवा पॅरॅलेसिस सारखे विकार होऊ शकतात. साधारणपणे सदाफुली ही वनस्पती मूलधारा चक्रावर बॅलन्स करणारी एकमेव वनस्पती आहे.काही जणांना सतत डोकेदुखीचा त्रास असतो. त्यांचा चंद्र हा बळ देणारा नसतो. अनेकांच्या कुंडलीमध्ये चंद्र बलवान असतो पण त्यांना झोप लागत नाही. मानसिक तणाव किंवा एखादी गोष्ट विसरणे या प्रकारच्या समस्या त्यांना सतातवता. त्यांनी सदाफुली ही वनस्पती भरणी नक्षत्रावर निळ्या रंगाच्या वस्त्रामध्ये मनगटावर बांधावी. त्यांना चंद्र बल प्रधान करतो, असा सल्ला जोशी यांनी दिला.पगारवाढ आणि प्रमोशनसाठी फॉलो करा या सोप्या वास्तू टिप्सवास्तुशास्त्रानुसार सदाफुली ही नेहमी ईशान्य दिशेला असावे जर आपल्या घरामध्ये बाग असेल किंवा शेती किंवा बंगला जरी असेल तर त्या ठिकाणी ईशान्य दिशेला सूयार्चा जर प्रकाश पडत असेल तर अशा ठिकाणी सदाफुलीची कुंडे किंवा रोप लावावे, असा सल्लाही जोशी यांनी दिला.



# त्वचेचे सौंदर्य वाढवण्यासाठी गुणकारी रेड वाइन

अल्कोहोल हे आरोग्यासाठी घातकच असते. मात्र काळ्या द्राक्षांपासून तयार करण्यात आलेली रेड वाइन हेल्थसाठी फायदेशीर मानली जाते. असे तेव्हा होते जेव्हा याचे सेवन औषधाच्या रुपात केले जाते. रेड वाइन मध्ये लोह, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन-सी असतात. त्याचसोबत यामध्ये अँन्टीऑक्सिडेंट्स जसे रेस्वोराट्रोल आणि पॉलीफेनोल्स असतात. जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि तणाव ही दूर करतात. अशातच आम्ही तुम्हाला आज रेड वाइनचे नक्की काय फायदे होतात याच बद्दल सांगणार आहोत.

- रोगप्रतिकारकशक्ती वाढते - रेड वाइन मध्ये लोह, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन बी6 आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. या व्यतिरिक्त यामध्ये प्रोएंथोसायनीडीन्स आणि रेस्वेराट्रोल सारखे ॲक्टिव्ह अँन्टीऑक्सिडेंट असतात जे तुमची रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यास मदत करतात.
- कोलेस्ट्रॉलसाठी सुद्धा फायदेशीर - मर्यादित प्रमाणात रेड वाइनचे सेवन केल्याने बॅड कोलेस्ट्रॉल ५० टक्क्यांपर्यंत कमी होते. तर रक्तातील गुड कोलेस्ट्रॉल म्हणजेच एचडीएलचा स्तर कायम राहतो. अशातच कोलेस्ट्रॉलचा स्तर कमी झाल्यास हृदयरोगाचा धोका फार कमी होते. या व्यतिरिक्त एका अभ्यासातून असे समोर आले आहे की, आठवड्यातून ३-४ दिवस दररोज १ ग्लास तरी रेड वाइनचे सेवन करावे.
- त्वचेसाठी फायदेशीर - रेड वाइनमुळे शरिरातील ब्लड सकुर्लेशन सुरळीत राहते. जर वाइन तुम्ही त्वचेवर लावली तर डेड स्किन निघण्यास मदत होईल. तसेच त्वचा मऊ सुद्धा होते. या व्यतिरिक्त तुम्ही वाइनचा पॅक तयार करुन चेहऱ्याला लावू शकता.
- मधुमेहासाठी फायदेशीर - मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी रेड वाइन फायदेशीर मानली जाते. ती रक्तातील शर्कराचा स्तर कमी करते.
- उत्तम झोपेसाठी - जर रात्री झोपताना समस्या उद्भवत असेल तर तुम्ही रेड वाइन पिऊ शकता. आठवड्यातून एकदा तरी रेड वाइन प्यायल्याने उत्तम झोप येण्यास मदत होईल.



# घरातील केळी खराब होतात का ? वापरा या टिप्स

केळी हे असे फळ आहे जे दीर्घकाळ टिकू शकत नाही. फळे चांगली राहण्यासाठी ती फ्रीजमध्ये ठेवतो. केळी खाल्ल्याने शरीरातील ऊर्जा वाढते तसेच केळीच्या प्युरीमुळे अप्रतिम त्वचा आणि सुंदर केस मिळण्यास मदत होते. तसेच केसांना रेशमी आणि चमकदार करण्यासाठी केळींची विषेश मदत होते. मात्र केळी फ्रीजमध्ये ठेवता येत नाहीत. अशात ती बाहेर ठेवल्यास काळी पडून खराब होतात. केळी लवकर खराब होऊ नये यासाठी 'या' टिप्स नक्की फॉलो करुन पाहा...

- कोणतीही फळे किंवा वस्तू फ्रीजला ठेवली तर ती जास्त दिवस टिकतात.
- सर्वसामान्यपणे खाण्या-पिण्याच्या गोष्टी फ्रेश ठेवण्यासाठी रेफ्रिजरेटरचा वापर केला जातो.
- पण केळं हे फळ याला अपवाद आहे.
- केळी कधीही फ्रीजमध्ये ठेवू नयेत. केळी फ्रीजमध्ये ठेवल्यास लवकर खराब होण्याची शक्यता असते.
- केळी खरेदी करून आणल्यावर त्यांच्या देठावर पेपर किंवा प्लास्टिक रॅप करावे.
- बाजारात केळीचे हँगर मिळते. त्यावर टांगल्याने केळी बराच काळ टिकतात.
- व्हिटॅमिन सी ची टॅबलेट पाण्यात विरघळून त्या पाण्यात केळी बूडवून ठेवावी. त्यामुळे केळी लवकर खराब होणार नाहीत.
- केळी कधीही फ्रिजमध्ये ठेवू नये. केळी नेहमी सामान्य तापमानातच ठेवावी.
- केळी वॅक्स पेपरने झाकून ठेवावी.
- पाण्यात सोडा घालून त्यात थोड्यावेळ भिजवून ठेवावे. नंतर ती केळी खोलीतल्या सामान्य तापमानात ठेवावे.
- त्वचेचं वॅक्सिंग करण्यासाठी ज्या वॅक्स पेपरचा वापर केला जातो.
- या पेपरचा वापर तुम्ही केळी फ्रेश ठेवण्यासाठीही करू शकता.
- वॅक्स पेपरमध्ये केळी गुंडाळून झाकून ठेवली, तर ती लवकर खराब होत नाहीत.
- केळी दीर्घ काळ टिकावीत यासाठी केळयांच्या फणीचं देठ प्लास्टिक किंवा सेलोटेपने गुंडाळून ठेवावं.
- या ट्रिकमुळेही केळी फ्रेश राहतात.



# प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी भोपळी मिरची आहे फायदेशीर

**प्रतिकारशक्ती वाढवते -** भोपळी मिरची आम्ही वर सांगितल्याप्रमाणे इम्युनिटी सिस्टिम मजबूत करण्यासाठी मदत करते. यामध्ये विटामिन सी चे प्रमाण अधिक असते. त्यामुळे प्रतिकारशक्ती तंत्र मजबूत करण्यासह आप्लया मेंदूसाठीही याचा फायदा होतो. याशिवाय मेंदूवर येणारा ताण, तणाव, दमा आणि कॅन्सर यासारख्या आजारांवरही ही उपायकारक ठरते. त्यामुळे नियमित भोपळी मिरचीचे सेवन आपल्या आहारामधून होणे गरजेचे आहे.

**लठ्ठपणा होईल कमी -** ज्या व्यक्तींना आपला लठ्ठपणा आणि वजन कमी करायचं आहे त्यांच्यासाठी भोपळी मिरची फायदेशीर ठरते. भोपळी मिरचीमध्ये अतिशय कमी प्रमाणात कॅलरीज असतात. त्यामुळे याचे सेवन केल्यावर वजन वाढण्याची शक्यता फारच कमी प्रमाणात असते. तसंच मेटाबॉलिजम चांगलं करण्यासाठी याची मदत होते आणि वजन त्यामुळे कमी होते.

**पोषक तत्वांचं प्रमाण अधिक -** भोपळी मिरचीमध्ये विटामिन ए, विटामिन सी, फलेवानॉईड्स, अल्कानॉईड्स अशा प्रकारची पोषक तत्व आढळतात. भोपळी मिरचीमध्ये आढळणारे अल्कालॉईड्स हे अँटीइन्फ्लेमेरी आणि अँटिऑक्सिडंट्सचे काम करतात. त्यामुळे प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत मिळते. ही सर्व पोषक तत्व शरीराला मिळण्यासाठी इतर पदार्थ शोधण्यापेक्षा एकच भोपळी मिरची फायदेशीर ठरू शकते. त्यामुळे आठवड्यातून किमान दोन ते तीन वेळा तरी कोणत्या ना कोणत्या पदार्थांमधून भोपळी मिरचीचे सेवन करावे.

**हृदयासाठी फायदेशीर -** फ्लेवेनॉईड्स असल्यामुळे भोपळी मिरची तुम्हाला हृदयरोगाच्या समस्यांपासून दूर ठेवते. संपूर्ण शरीराला योग्य ऑक्सिजनचा पुरवठा होण्यासाठी याची मदत होते. ज्यामुळे हार्ट पंपिंग होण्यामध्ये कोणतीही बाधा येत नाही आणि तुम्हाला कोणताही त्रास होत नाही.

**शरीरातील लोहाची कमतरता होते दूर -** शरीरामध्ये लोह अर्थात आयरनची असणारी कमतरता यातील विटामिन सी मुळे दूर होण्यास मदत मिळते. यामध्ये विटामिन सी चं योग्य प्रमाण असतं. त्यामुळे भोपळी मिरचीचे सेवन केल्याने लोहाची कमतरता आपल्या शरीरामध्ये जाणवत नाही. तसंच ॲनिमिक होण्यापासूनही संरक्षण मिळते. ज्या व्यक्तींना लोहाची कमतरता असेल त्यांच्यासाठी भोपळी मिरची नक्कीच एक वरदान आहे.

# कविता

## उधाणलेल्या प्रिय सागरा, सांग ना..

उधाणलेल्या प्रिय सागरा, सांग ना.
माझ्याशी गुजगोष्टी करशील का?
तुझ्याच आयुष्याच्या आज मला
कटू आठवणी सांगशील का? //01//
उधाणलेल्या प्रिय सागरा,सांग ना..
फेसाळलेल्या तुज्या प्रवाही लाटा
क्षणात रौद्र रूप धारण करतात का
किनाऱ्यावर थयथयाट करून त्या
स्वतःच लुप्त होऊन जातात का? //02//....
उधाणलेल्या प्रिय सागरा,सांग ना..
इथे अचानक त्सुनामी येते का?
तुझ्या किनारी बसलेल्याना तु
अचानक कवेत घेऊन मारतोस का? //03//...
उधाणलेल्या प्रिय सागरा,सांग ना..
तु टायटानिकचा करुण अंत केलास का?
जगाची पहिली सफर करणाऱ्यांची
तु अखेरची सफर ठरवलीस का? //04//...
उधाणलेल्या प्रिय सागरा,सांग ना..
तुझ्याच पाण्याची वाफ होते का?
पावसाच्या रूपाने धरतीवर बरसुनी
झरे,ओढे,नदी-नाले बनूनी त्या
पुन्हा तुलाच येऊन मिळतात का?. //05//...


कविता लेखन :- जयराम कमळू पारधी, रा. सागाची वाडी, कर्जत, रायगड.
मो. नं.7770098817


# खजूर खाण्याचे आश्चर्यकारक आहेत अनेक फायदे जाणून घ्या



आयुर्वेदानुसार खजूर शक्तीवर्धक, पौष्टिक, श्रमहारक आणि वीर्यवर्धक फळ आहे. भारतात रेताड जमिनीमध्ये खजूराची झाडं सहज उगवतात. मात्र खजूराची झाडे सौदी अरेबिया, इराक, अफगाणिस्तान या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आढळतात. नियमित दोन खजूर खाण्याची सवय लावल्यास तुम्हाला नक्कीच चांगला फायदा होऊ शकतो. यासाठी जाणून घ्या खजूर खाण्याचे आरोग्यदायी फायदे.

**पचनशक्ती सुधारते**

खजूरामध्ये मोठ्या प्रमाणावर फायबर्स असतात. ज्यामुळे तुमच्या पचनसंस्थेवर चांगला परिणाम होतो. जेव्हा तुमच्या शरीरातील पचनकार्य सुरळीत सुरू असते तेव्हा तुम्हाला पोटाच्या तक्रारी कमी प्रमाणात जाणवतात. बद्धकोष्ठता अथवा अपचनाच्या समस्या असलेल्या लोकांना नेहमी खजूर खाण्याचा सल्ला दिला जातो. खजूरामध्ये विरघळणारे आणि न विरघळणारे असे दोन्ही प्रकारचे फायबर्स असतात. यासाठी दररोज रात्री दोन खजूर पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी त्याचे सेवन करा.

**हृदयासाठी उत्तम**

खजूरामध्ये असलेले फायबर्स तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम असतात. शिवाय त्यामध्ये मुबलक प्रमाणात मॅग्नेशिअमदेखील असते. एका संशोधनानुसार जर एखाद्या व्यक्तीने दररोज १०० ग्रॅम मॅग्नेशिअम असलेले पदार्थ सेवन केले तर त्याला हृदयरोग होण्याचा धोका कमी होतो. त्यामुळे जर तुम्हाला हृदयाचे आरोग्य सांभाळायचे असेल तर दररोज दोन खजूर जरूर खा.

**रक्तदाब नियंत्रित राहतो**

खजूरामध्ये मॅग्नेशिअम आणि पोटॅशिअम भरपूर असते. ज्यामुळे तुमचा रक्तदाब नियंत्रित राहतो. जर तुम्हाला हाय ब्लड प्रेशर अथवा लो ब्लड प्रेशरचा त्रास होत असेल तर दोन खजूर रोज खाण्याची सवय स्वतःला लावा.

**ॲनिमियाचा त्रास कमी होतो**

जर तुम्हाला रक्ताच्या कमतरतेमुळे अथवा रक्तातील लोहाचे प्रमाण कमी असल्यामुळे अशक्तपणा जाणवत असेल. तर तुम्हाला या समस्येवर लवकर उपाय करण्याची गरज आहे. कारण रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक आरोग्यसमस्या डोकं वर काढतात. खजूरामध्ये भरपूर प्रमाणात लोह असतं. जर तुम्ही दररोज दोन खजूर खाण्याची सवय लावली तर तुमचा अशक्तपणा कमी होतो.

**सेक्स लाईफ सुधारते**

खजूरामध्ये असलेल्या पोषक घटकांमुळे स्पर्म काऊंट वाढतो. बाळ जन्माला येण्यासाठी पुरूषांमध्ये शूक्राणूंची संख्या आणि गुणवत्ता चांगली असणे गरजेचं आहे. कारण या कारणांमुळे आजकाल अनेक जोडप्यांना वंधत्वाला सामोरं जावं लागत आहे. मात्र संशोधनानुसार जर तुम्ही खजूर खात असाल तर तुमचं सेक्स लाईफ चांगलं होऊ शकतं. यासाठीच बाळासाठी प्रयत्न करणाऱ्या आणि वैवाहिक जीवन सुखाचं असावं असं वाटणाऱ्या पुरूषांनी दररोज खजूर खाल्ल्यास त्यांना फायदा होऊ शकतो.

**डोळ्यांचे आरोग्य सुधारते**

दररोज खजूर खाण्याने केवळ डोळ्यांचे आरोग्य सुधारते असे नाही तर तुम्हाला रातांधळेपणा, रंगांधळेपणा अशा समस्या निर्माण होत नाहीत. यासाठीच दररोज खजूर खाण्यास सुरूवात करा.

**दात मजबूत होतात**

खजूरामध्ये फ्लोरीन नावाचे एक केमिकल असते. ज्याच्यामुळे दातांमध्ये कीड लागण्याची समस्या कमी होऊ शकते. खजूरामुळे तुमच्या हिरड्या आणि दात मजबूत होतात. यासाठी दात आणि हिरड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी दररोज दोन खजूर अवश्य खा

**वजन वाढते**

वजन कमी करण्याप्रमाणेच अनेकांना वजन वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. खजूरामध्ये अनेक पोषकतत्व दडलेले असतात. ज्यामुळे दररोज सकाळी खजूर खाल्ल्यास तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो. कृष प्रकृतीच्या लोकांनी दुधासोबत दररोज दोन खजूर खाल्ल्यास त्यांचे वजन वाढणे सोपे होऊ शकते.

## बोधकथा

# गणेश आणि कमळ

एकदा, ब्रह्मांडाचे निमार्ते भगवान ब्रह्मदेव यांनी विश्वाचे रक्षणकर्ता भगवान विष्णू यांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ (पवित्र अग्नी विधी) करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या प्रेमाचे आणि भक्तीचे प्रतीक म्हणून त्याला भगवान विष्णूला अर्पण करण्यासाठी एक सुंदर कमळाचे फूल तयार करायचे होते.

तथापि, जेव्हा त्याने मंत्रांचे पठण करण्यास आणि विधी करण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला जाणवले की तो यज्ञासाठी सर्वात महत्वाचा घटक - कमळाचे फूल विसरला आहे. तो काळजीत पडला आणि विचार करू लागला की फुलाशिवाय तो विधी कसा पूर्ण करू शकतो. त्याच क्षणी श्रीगणेश त्याच्यासमोर प्रकट झाला आणि त्याला विचारले की काय चूक आहे. भगवान ब्रह्मदेवाने परिस्थिती समजावून सांगितली आणि भगवान गणेशाला विचारले की तो त्याला कमळाचे फूल शोधण्यात मदत करू शकेल का? भगवान गणेश हसत हसत त्याचे एक दात बाहेर काढले, जे त्याने जवळच्या तलावात फेकले. भगवान ब्रह्मदेव आश्चर्यचकित होऊन पाण्यातून एक सुंदर कमळ फुलले. त्यानंतर भगवान गणेशाने कमळाचे फूल भगवान ब्रह्मदेवाला अर्पण केले, ज्याने ते यज्ञात वापरले आणि भगवान विष्णूंना प्रसन्न केले.

भगवान ब्रह्मदेवाच्या मदतीसाठी भगवान गणेशाने स्वतःच्या तुकड्याचा त्याग केल्याची कृती प्रेम आणि भक्तीची शक्ती दर्शवते. हे प्रेम आणि भक्तीच्या शोधात निस्वार्थीपणा आणि त्यागाचे महत्त्व देखील दर्शवते.

भगवान गणेश आणि कमळाची कथा अनेकदा हिंदू कलेत चित्रित केली जाते आणि इतरांच्या गरजा आपल्या स्वतःच्या आधी ठेवण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतात. हे आपल्याला भौतिक संपत्ती आणि वैयक्तिक लाभापेक्षा प्रेम, भक्ती आणि निःस्वार्थीपणाचे महत्त्व देण्यास शिकवते.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. १, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, गजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिर जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898